पत्र

जा.क्र.कृआ/विप्र.१ तृधावि/मा.सू/बियाणेवाटप/ /२०१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११००५ **दिनांक : ७/५/ २०१२**

**प्रति,**

१) **विभागीय कृषि सहसंचालक** ठाणे, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर

२) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, नागपूर

**विषय :- केंद्र पुरस्कृत तृणधान्य विकास कार्यक्रम सन २०१२-१३ अंतर्गत खरीप हंगाम भात बियाणे वितरण कार्यपध्दती.....**

**संदर्भ :-** जा.क्र.कृआ/विप्र-१/तृधावि/मा.सू/ / /२०१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५, दि. मे २०१२

उपरोक्त संदर्भानुसार तृणधान्य विकास कार्यक्रम सन २०१२-१३ मध्ये राबवावयाच्या कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत. सन २०१२-१३ मध्ये तृणधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत ५५१२२ क्विंटल सुधारीत वाणाचे प्रमाणीत बियाणे प्रति क्विंटल रु.५००/- प्रमाणीत बियाणे अनुदानावर वितरीत करावयाचे आहे.

**प्रकल्पाअंतर्गत बियाणे वाटप**

सन २०१२-१३ मध्ये तृणधान्य विकास योजना हा कार्यक्रम प्रकल्प स्वरुपात राबवावयाचा असून तृणधान्य विकास कार्यक्रम भातासाठी प्रत्येकी १०० हेक्टर प्रमाणे ३३० लघुप्रकल्पांमध्ये कार्यक्रम राबविण्यात येईल. प्रत्येक लघुप्रकल्पात ९ क्विंटल सुधारीत वाणाचे प्रमाणीत बियाणे अनुदानावर वितरीत करण्यात यावे.

जिल्हानिहाय प्रकल्पसंख्या व प्रकल्पा अंतर्गत अनुदानावर वाटप करावयाचे सुधारीत वाणाचे प्रमाणीता बियाण्याचे लक्षांक प्रपत्र – 1 मध्ये देण्यात आलेले आहे. तसेच वाण निहाय पॅकींगनिहाय बियाण्याचे दर, अनुदान व शेतकर्यांकडुन वसुल करावयाचा शेतकरी हिस्सा याबाबतची माहिती प्रपत्र -३ मध्ये देण्यात आली आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी यांनी महाबीजचे क्षेत्रिय/विभागीय व्यवस्थापकाकडुन उपलब्ध बियांण्याची वाण निहाय माहिती घ्यावी व त्याआधारे आपल्या जिल्ह्यातील लघुप्रकल्पांची व सदर प्रकल्पामध्ये कोणत्या ठिकाणी कोणत्या वाणाचे बियाणे संबंधित मंडळ कृषि अधिकारी पोहोच करावयाचे आहे याबाबत महाबिजचे विभागीय अधिकार्यांना सूचना देण्यात याव्यात तसेच बियाणे वाटपाचे वेळापत्रक तयार करुन संबंधीत शेतकर्यांना बियाणे वाटपाचे दिनांक व वेळ कळवावी. महाबीज यांचेकडून बियाणे प्राप्त होताच मंडळ कृषि अधिकारी यांनी प्रकल्पामध्ये निवडलेल्या शेतकर्यांना कृषि पर्यवक्षक, कृषि सहाय्यक व शेतकरी गट प्रमुखाच्या सहाय्याने बियाणे वाटप करावयाचे आहे. बियाणे वाटप करतांना अनुदान वजा जाता शेतकरी वाटा शेतकर्यांकडुन वसूल करुन महाबीज कडे जमा करावा व अनुदानाचे अदायगीसाठी तालुका कृषि अधिकारी यांचे मार्फत कृषि विकास अधिकारी यांना प्रस्ताव सादर करावा. कृषि विकास अधिकारी यांनी पुर्ण बियाणे वाटप होई पर्यंत प्रकल्पांतर्गत बियाणे वाटपाचा अहवाल प्रत्येक आठवडयाच्या शुक्रवारी कृषि आयुक्तालयास ई-मेल द्वारे agriexten@rediffmal.com या ईमेलवर सादर करावा.



http://mahaagri.gov.in/

## प्रकल्पाबाहेर बियाणे वाटप

प्रकल्पाबाहेर वाटप करावयाच्या बियाण्याचे जिल्हा निहाय लक्षांक प्रपत्र -२ मध्ये देण्यात आलेले आहे. त्याचे तालुकानिहाय लक्षांक महाबीज यांना देण्यात यावे. सदर बियाणे महाबीज यांनी त्याचे वितरका मार्फत अनुदानावर वाटप करावयाचे आहे. त्याचे लक्षांकानुसार वाटपाचे संनियंत्रण कृषि विकास अधिकारी यांनी करावयाचे आहे.

प्रकल्पाबाहेर बियाणे वाटपासाठी अनुदानाचा दर शेतकरीवाटा प्रपत्र -२ मध्ये दर्शविल्यानुसार राहिल. महाबीज यांनी त्यांचे वितरकामार्फत वाटप झाल्यानंतर वाटपाच्या याद्या संबंधीताकडे द्याव्यात.. कृषि विकास अधिकारी यांनी त्यांचेस्तरावरुन अनुदानचे अदायगी करावी. व अंतिम वाटप अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करावा.
“आपणांस खरीप हंगामासाठी हार्दिक शुभेच्छा.”

कृषि संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय,म.रा.पुणे-५

**प्रतः- मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाबीज भवन, कृषि नगर, अकोला – ४४४ १०४.**

सोबत प्रपत्र-१ मध्ये प्रकल्पाअंतर्गत बियाणे वाटपाचे लक्षांक देण्यात आले असून कृषि विकास अधिकारी यांचेकडून प्रकल्पाअंतर्गत बियाणे वाटपासाठी प्रपत्र-२ मध्ये प्रकल्पा बाहेरील जिल्हानिनहाय बियाणे वाटपाचे लक्षांक तालुका निहाय/मंडळ कृषि अधिकारी निहाय वाटपाचे लक्षांक महाबीज यांना कळविण्यात येतील त्यानुसार मंडळ कृषि अधिकारी यांचे कडे बियाणे पोहोच करावे. सदर बियाण्याचे वाटप मंडळ कृषि अधिकार्यांमार्फत करण्यात येईल. प्रकल्पा अंतर्गत बियाणे वाटपाचे अनुदान कृषि विकास अधिकारी मार्फत अदा करण्यात येईल व शेतकरी वाटा शेतकर्यांकडुन वसूल करुन तालुका कृषि अधिकार्यांमार्फत महाबीजकडे जमा करण्यात येईल.

प्रपत्र-२ मध्ये प्रकल्पाबाहेर वाटप करावयाचे सुधारीत वाणांचे प्रमाणीत बियाण्यांचे जिल्हानिहाय लक्षांक देण्यात आले असून जिल्ह्याचे कृषि विकास अधिकारी यांच्या कडुन तालुकानिहाय वाटप आपणांस कळविण्यात येईल त्यानुसार आपण आपल्या वितरकांकडे बियाणे उपलब्ध करुन द्यावे. शेतकर्यांना बियाणे घेण्यांसाठी जास्त अंतर जावे लागणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी. वाणनिहाय किती बियाणे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे याची वितरकनिहाय माहिती संबधीत तालुक्याचे तालुका कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी यांना द्यावी. बियाण्यांसाठी अनुदानाचा दर अधिक उत्पन्न देणार्या भात वाणाच्या बियाण्यासाठी रु.५००/- प्रति क्विंटल असुन त्यानुसार पॅकींगनिहाय अनुदान वजा जाता शेतकर्यांकडुन वसूल करावयाची किंमत याची महिती सोबत प्रपत्र -३ मध्ये दिली आहे.

आपल्या वितरकांकडे दर्शनी भागावर तृणधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत भात पिकाचे बियाणे अनुदानावर उपलब्ध असल्याचा फलक लावावा तसेच प्रपत्र -३ मध्ये दर्शविल्यानुसार वाणनिहाय महाबीजचे दर अनुदान व अनुदान वजा जाता पॅकींगनिहाय येणारी किंमत (शेतकरी वाटा) याची माहिती फलकावर दर्शविण्यात यावी.

बियाणे घेण्यास येणा-या शेतक-याची खात्री करुन शेतक-याचे नाव, गाव, गट क्रमांक, क्षेत्र याबाबतची माहिती घेऊन संबधित वितरकांनी अनुदान वजा जाता येणारी किंमत घेऊन शेतक-यांला जास्तीत जास्त ५ हेक्टरच्या मर्यादेत बियाणे वितरीत करावे. **कोणत्याही परीस्थीतीत अनुदान वजा जाता शेतक-याकडुन घ्यावयाची रक्कम कृषि विभागाकडुन दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**



http://mahaagri.gov.in/

आपल्या जिल्ह्याचे विपणन अधिकारी यांनी याचे सनियंत्रण करण्याच्या सुचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. बियाण्याचे वाटप शेतक-यांनाच होईल याबाबतची खात्री करण्यात यावी. बियाण्याचे वाटप दि. २० मे २०१२ अखेर पुर्ण करावे. कृषि विकास अधिकारी स्तरावरुन याची छाननी होऊन अनुदानाची रक्कम महाबीजला अदा केली जाईल.

गुणवत्तेची काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातून बॅचनिहाय नमुने काढण्यात येतील. ज्या बॅचचे नमुने अप्रमाणित दिसुन येतील त्या बॅचच्या बियाण्याची अदायगी होणार नाही तसेच त्या बॅचचे पुढील वाटप थांबविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**“आपणांस खरीप हंगामासाठी हार्दिक शुभेच्छा.”**

**सोबत :- वरीलप्रमाणे.**

**कृषि संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

http://mahaagri.gov.in/

## प्रपत्र-१

## प्रकल्पाअंतर्गत महाबीजचे वितरका मार्फत अनुदानावर वाटप करावयाचे सुधारीत वाण बियाणे लक्षांक

| अ.क्र. | जिल्हा | प्रकल्प संख्या | प्रकल्पाअंतर्गत सुधारीत भात बियाणे वितरण (वाण बदल) | |
|---|---|---|---|---|
| | | | भौतिक (क्विं) | आर्थिक (रू.हजारांत) |
| १ | ठाणे | ६८ | ६१२ | ३०६ |
| २ | रायगड | ६२ | ५५८ | २७९ |
| ३ | रत्नागिरी | ४० | ३६० | १८० |
| ४ | सिंधुदुर्ग | ४० | ३६० | १८० |
| ५ | धुळे | ५ | ४५ | २२.५ |
| ६ | नंदुरबार | १० | ९० | ४५ |
| ७ | अहमदनगर | ५ | ४५ | २२.५ |
| ८ | सातारा | २२ | १९८ | ९९ |
| ९ | सांगली | ८ | ७२ | ३६ |
| १० | कोल्हापूर | ५० | ४५० | २२५ |
| ११ | नागपूर | २० | १८० | ९० |
| **एकूण** | | **३३०** | **२९७०** | **१४८५** |

http://mahaagri.gov.in/

**प्रपत्र-२**

**प्रकल्पा बाहेरील महाबीजचे वितरका मार्फत अनुदानावर वाटप करावयाचे सुधारीत वाण बियाणे लक्षांक**

| अ.क्र. | जिल्हा | प्रकल्पाबाहेरील सुधारीत भात बियाणे वितरण (वाण बदल) | |
|---|---|---|---|
| | | भौतिक (क्विं) | आर्थिक (रू.हजारांत) |
| १ | ठाणे | १३००० | ६५००.०० |
| २ | रायगड | १४००० | ७०००.०० |
| ३ | रत्नागिरी | ३००० | १५००.०० |
| ४ | सिंधुदुर्ग | ५००० | २५००.०० |
| ५ | धुळे | ५५ | २७.५० |
| ६ | नंदुरबार | ५० | २५.०० |
| ७ | अहमदनगर | २२० | ११०.०० |
| ८ | सातारा | २२०० | ११००.०० |
| ९ | सांगली | २२०० | ११००.०० |
| १० | कोल्हापूर | ४५०० | २२५०.०० |
| ११ | नागपूर | ७९२७ | ३९६३.५० |
| **एकूण** | | **५२१५२** | **२६०७६.००** |

http://mahaagri.gov.in/

प्रपत्र-३

**भात पिकाच्या बियाणाचे पॅकींगनिहाय महाबीजचे दर, अनुदान व शेतकरी वाटा याची माहिती**

| अ.क्र | वाण | अधिसूचित वर्ष | महाबीजचा प्रति क्विंटल दर | शासकीय अनुदान प्रति क्विंटल | पॅकींगचा आकार | महाबीजचा पॅकींग दर | अनुदान वजाजाता पॅकनिहाय येणारी किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ कोर्स (जाड) वाण | | | | | | | |
| १ | जया | १९७१ | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |
| २ | कर्जत-३ | | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |
| ३ | कर्जत-५ | २००५ | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |
| ४ | एमटीयू १०१०, | २००० | रु.२७००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ६७५/-<br>८१०/- | ५५०/-<br>६६०/- |
| ५ | एमटीयू १००१, | १९९७ | रु. २७००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ६७५/-<br>८१०/- | ५५०/-<br>६६०/- |
| ६ | एमटीयू १०७५ | | रु. २७००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ६७५/-<br>८१०/- | ५५०/-<br>६६०/- |
| ७ | संपदा | | रु. २७००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ६७५/-<br>८१०/- | ५५०/-<br>६६०/- |
| २ मिडीएम वाण- | | | | | | | |
| १ | रत्ना | १९७४ | रु. ३०००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६००/-<br>७२०/- |
| २ | तेहसना | १९७५ | रु. ३०००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६००/-<br>७२०/- |
| ३ | आय-३६ | | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |
| ४ | आय आर ६४ | | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |
| ५ | कर्जत-२ | | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |
| ६ | कर्जत-७ | | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |

http://mahaagri.gov.in/

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | सुवर्णा | | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |
| ८ | आर-१ | | रु. २९००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७२५/-<br>८७०/- | ६००/-<br>७२०/- |
| ३ फाईन वाण | | | | | | | |
| १ | इंद्रायणी | १९९३ | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| २ | आर-२४ | २०१० | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| ३ | मसुरी | | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| ४ | कर्जत-६ | २००५ | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| ५ | जी.आर.-४ | १९७८ | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| ६ | जी.आर.-११ | १९८४ | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| ७ | भोगावती | २००७ | रु. ३०००/- | रु. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| ८ | पीकेव्ही - एचएमटी | २००८ | रु. ३००० | रु. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| ९ | फुले समुध्दी | २०१० | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| १० | आर.डी.आर.एन. ९४-२ | | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| ११ | पीकेव्ही खमंग | २००७ | रु. ३०००/- | रु. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| १२ | सांभा मसुरी (बि.पि.टी-५२०४) | १९८९ | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| १३ | सुधारीत सांभा मसुरी | २००८ | रू. ३०००/- | रू. ५००/- | २५ किलो<br>३० किलो | ७५०/-<br>९००/- | ६२५/-<br>७५०/- |
| १४ | जेजीएल-३८४ | | रु.२७००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ६७५/-<br>८१०/- | ५५०/-<br>६६०/- |
| १५ | जेजीएल-१७९८ | | रु.२७००/- | रु.५००/- | २५ किलो<br>३० किलो | ६७५/-<br>८१०/- | ५५०/-<br>६६०/- |
| ४ प्रिमियम वाण | | | | | | | |
| १ | पिकेव्ही एच.एम.टी | | रू. ३५००/- | रू. ५००/- | १२ किलो | ४२०/- | ३६०/- |
| २ | श्रीराम | | रू. ३५००/- | रू. ५००/- | १२ किलो | ४२०/- | ३६०/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | इंद्रायणी | १९९३ | रू. ३५००/- | रू. ५००/- | १२ किलो | ४२०/- | ३६०/- |
| ४ | सुगंधा-५ | १९८५ | रू. ३५००/- | रू. ५००/- | १२ किलो | ४२०/- | ३६०/- |
| ५ बासमती वाण | | | | | | | |
| १ | सुधारीत पुसा बासमती | | रू. ४७००/- | रू. ५००/- | १० किलो | ४७०/- | ४२०/- |

http://mahaagri.gov.in/